**प्रेस नोट दिनांक ०९/०६/२०१९**
**खडकी पोलीस स्टेशन, पुणे.**

**हरवलेल्या मुलाचा १२ तासाच्या आत शोध घेतला.**

दिनांक ०८/०६/२०१९ रोजी महिला नामे जिया पी राजन वय ४० वर्षे रा-फ्लॅट नं १७ कुंदन प्रेरणा सोसा भाऊ पाटीलरोड बोपेडी पुणे या त्यांचा मुलगा नामे ब्रेमण सुरेश वय १० वर्षे यास त्यांचे राहते घरातुन कोणीतरी नेले आहे. वगैरे मजकुरची तक्रार देणे कामी खडकी पोलीस ठाणेस आल्या होत्या.सदर तक्रारीची पोलीस उप निरीक्षक श्री ताटे यांनी तात्काळ दखल घेवुन खडकी पोलीस ठाणे कडील बीट मार्शल व तपासा पथकातील कर्मचारी यांना सदर मुलाचा शोध घेणे बाबत आदेशीत केले. त्यानुसार पो शि सोनवणे १२०१२ खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर हे सदर मुलाचा शोध घेत असताना त्यांना सदर मुलगा पुणे रेल्वे स्टेशन येथे असले बाबत खबर मिळाली प्राप्त खबरी नुसार पोलीस शिपाई सोनवणे लागलीच पुणे रेल्वे स्टेशन येथे रवाना झाले व त्यांनी रेल्वे स्टेशन परिसरात सदर मुलाचा शोध घेतला. तपासा दरम्यान त्यांना सदर मुलगा इसम नामे सिकंदर आडागळे रा - बापोडी पुणे यांना मिळुन आल्याने त्यांनी सदर मुलास रेल्वे पोलीसांच्या ताब्यात दिले बाबत माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी रेल्वे पोलसांकडे चौकशी केली असता रेल्वे पोलीसांनी त्योचे ताब्यात असलेला मुलगा नामे ब्रेमण सुरेश यास पोलीस शिपाई सोनवणे यांचे ताब्यात दिले. त्याबाबत पोलीस शिपाई सोनवणे यांनी सदर मुलास सुस्थितीत खडकी पोलीस ठाणेस हजर केले वरुन पोलीस उप निरीक्षण ताटे यांनी तो मुलगा महिला नामे जिया पी राजन यांचाच असले बाबत खात्री करुन त्यांचे ताब्यात दिले आहे.

एकंदरीत पो उप निरी श्री ताटे व पो शि सोनवणे १२०१२ यांनी उत्कृष्ट कामगीरी करुन हरवलेला १० वर्षाचा मुलगा त्यांचे पालकांना मिळवुन दिला आहे.

**( भागवत मिसाळ )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.